# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२२**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: ७०, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. दौलत दरोडा** |
| (१) | ४४३२ | १० | ठाणे व पालघर जिल्हयातील खालील आदिवासी क्षेत्रातील महत्वाचे रस्ते होणे हे अतिशय आवश्यक असणे तेथे रस्ते नसल्याने शिक्षण, आरोग्य, कुपोषण, दळणवळण सर्वच प्रश्न स्वातंत्र्यापासून प्रलंबित राहणे, त्यामुळे येथील लोकप्रतिनिधी व जनतेमध्ये असलेली नाराजी, आंदोलने, उपोषणे यासारखे प्रकार त्यामध्ये वन्यजीव क्षेत्रामध्ये रस्ते असल्याने बन विभागाचे सहकार्य न करण्याची भावना याकडे शासनाचे लक्ष वेधण्याची नितांत आवश्यकता.१) वाशिंद-पिवळी कांबारे रस्ता, ता. शहापूर, जि.ठाणे, २) तईची वाडी जोडरस्ता, ता. शहापूर, जि.ठाणे, ३) रा मा ३४ ते पाचघर जोडरस्ता, ता.वाडा, जि. पालघर, ४) रा मा ३४ ते खोडदे जोडरस्ता, ता.वाडा, जि. पालघर,५) रा मा ७७ खर्डी-परळी वैतरणा धरणाकडे जाणारा रस्ता, ता. वाडा, जि पालघर,६) काटीचापाडा सातरोंडे रस्ता करणे, ता.वाडा, जि. पालघर,७) पिंजाळ-दाभोण जोडरस्ता तयार करणे, ता.वाडा, जि. पालघर,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ४४३९ | १० | शहापूर जि. ठाणे येथील सा.बां. विभाग अंतर्गत येते असलेल्या (१) आसनगाव-बोरशेती-अंदाड रस्त्यावर पूलाचे बांधकाम (२) काजळविहिर मुहपाडा भातसानदिवर पूलाचे बांधकाम हे अतिशय धोकादायक असणे, त्यामळे येथे महाड सारखी सावित्री नदीवर घडलेली घटनेचा पुन्हा प्रकार घडण्याची शक्यता या रस्त्यावर ये-जा करणा-यांची जीव मुठीत ठेवून प्रवास करण्याची भावना, भितीचे वातावरण सा बां विभागाने वरील ठिकाणी नविन पूल मंजूर करण्याबाबतची होत असलेली मागणी याकडे लक्ष देण्याची शासनाची आवश्यकता सदर ठिकाणी नाबार्ड योजनेतून पूल तातडीने मंजूर करणेबाबत मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ४४४० | १० | पालघर जिल्ह्यातील (१) देसाई-निळसा-बेलवड रस्ता (२) वाडा-देवळी-मलवाडा रस्ता (३) शिलोत्त येथील गारगाई नदीवरील पूल याची झालेली दैनिय अवस्था याठिकाणी प्रवास करणा-यांना होत असलेल्या सततचा त्रास अति पावसात हा रस्ता ८-८ दिवस बंद राहणे याकरीता पर्यायी रस्ता उपलब्ध नसणे, वरील रस्ते AMC मधून प्राधान्याने नवीन मागणी असणे, शिलोत्तर नदीवरील पूल धोकादायक असणे, याबाबत लोकांमध्ये शासनाविरुध्द पसरलेला असंतोषाचे वातावरण, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (४) | ४४०३ | १० | लातूर/औसा (जि.लातूर) तालुक्यातील जिल्हापरिषद अंतर्गत येणारे मार्ग जिल्हा परिषदेचा रस्ता भादा ते शिंदेवाडी ५ कि.मी.अंतर तसेच कळंब रोड ते दिंडेगाव ५ कि.मी आणि येळी ते वांजरखेडा पाटी ५ कि.मी. या रस्ताची अत्यंत दुरावस्था झाली असून नागरीकांची गैरसोय होत असणे, काही प्रसंगी छोटे मोठे अपघात होत असल्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन सदर रस्त्यांसाठी तातडीने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ४४३६ | १० | लातूर/औसा (जि.लातूर) तालुक्यातील जिल्हापरिषद अंतर्गत येणारे मार्ग जिल्हा परिषदेचा रस्ता भादा ते शिंदेवाडी ५ कि.मी.अंतर तसेच कळंब रोड ते दिंडेगाव ५ कि.मी आणि येळी ते वांजरखेडा पाटी ५ कि.मी. या रस्ताची अत्यंत दुरावस्था झाली असून नागरीकांची गैरसोय होत असणे, काही प्रसंगी छोटे-मोठे अपघात होत असणे, भादा- शिंदेवाडी ग्रा.मा. ४ ता. औसा येथे दि. ०४/०८/२०२२ रोजी नदीला आलेला पूर व कमी उंचीचा पुल यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना रात्री ८ वाजेपर्यंत घरी जाता न येणे, स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन सदर रस्त्यांसाठी तातडीने निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. अशोक पवार** |
| (६) | ४४४४ | १० | मौजे विठ्ठलवाडी ता. शिरुर व मौजे सांगवी सांडस, ता. हवेली जि. पुणे या दरम्यान भिमा नदीवर कोल्हापूर पध्दतीचा के.टी. वेअर असून या के.टी. वेअर वरुन वाहतुक होत असते. हा केटी वेअर अत्यंत धोकादायक असल्याने या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसणे, या ठिकाणी मोठया पुलाचे बांधकाम झाल्यास दोन्ही बाजूच्या नागरिकांची 15 किमी अंतराची बचत होणार असणे, त्यामुळे सदर ठिकाणी पुल बांधणे अत्यंत गरजेचा आहे. तरी मौजे विठ्ठलवाडी ता. शिरूर व मौजे सांगवी सांडस ता. हवेली जि. पुणे या गावांदरम्यान भिमा नदीवर मोठया पुलाचे बांधकाम होणेकरिता आगामी अर्थसंकल्पामध्ये मंजूरी मिळून निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता असणे, याबाबत वरील कामे प्राधान्याने मंजूर करुन येथील ग्रामस्थांची गैरसोय दुर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |
| (७) | ४४४५ | १० | शिरुर-हवेली मतदार संघातील वढू बु. तुळापूर छत्रपती संभाजी महाराज यांचे भव्य स्मारक करण्याकरिता वढु तुळापूर विकास मंजूर करण्यात आलेला असणे, सदर आराखडयामध्ये तुळापूर आपटी दोन जोडणारा पूल पर्यटकांच्या दृष्टीने तुळापूर स्मारक व बु. येथील समाधीला अतिमहत्वाचा असणे, सदर पुलाची संकल्पना पूल कम बंधारा करण्याचे नियोजन असणे, पर्यटक शेतकऱ्यांसाठी फायदेशिर ठरेल तरी सदर पुलास आगामी अर्थसंकल्पा मध्ये मंजूर करण्याची आवश्यकता असणे, याबाबत वरील कामे प्राधान्याने मंजूर करुन येथील ग्रामस्थांची गैरसोय दुर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (८) | ४३५८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी विधानसभा क्षेताअंतर्गत ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालूक्याचा समावेश असणे, या तिनही तालुक्यातील रस्ते व पुल नादुरुस्त असल्यामूळे रहदारी अयोग्य असल्याने वारंवार अपघात घडणे, या कारणास्तव सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे जानेवारी, २०२१ पासून तर आतापर्यत रस्ते व पुलाचे बांधकाम करण्यासाठी निधीसह प्रशासकीय देऊन मंजूर करणे, मंजूर असलेली ही सर्व कामे सुरु करण्याच्या अंतिम ठप्पात असतांनाच राज्य शासनाच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने दिंनाक २६ जुलै, २०२२ रोजी परिपत्रक काढून दिनांक १ एप्रिल, २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागाला कळविलेले असणे, त्यामूळे या तिनही तालुक्यातील दळणवळणाचे मुख्य साधन असलेल्या सर्व विकास कामांना स्थगिती देण्यात आली असल्यामूळे विकास कामे ठप्प झाली असल्यामूळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामूळे माहे जुलै, २०२२ च्या सुमारास राज्य शासनाने विकासकामासाठी दिलेली स्थगिती रदद करुन चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील माहे जानेवारी, २०२१ पासून तर आतापर्यत मंजूर असलेली सर्व विकासकामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुर्ववत सुरु राहण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (९) | ४४२८ | १० | मदिना चौक ते सावंतवाडी दफन भूमी ( ता. सावंतवाडी, दि. सिंधुदूर्ग ) हा राज्यमार्ग अत्यंत खराब झाला असणे,दोन्ही बाजुची गटारे खराब झाली असणे तसेच कोसळली असणे, सदर राज्यमार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरण व नविन गटारे बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: ७२, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (१०) | ४३२२ | १० | तालुका रावेर येथील रामा-45 कोचुर चीनावल उटखेडा, मुंजलवाडी, रसलपुर, केऱ्हाळे, भोकरी, तामसवाडी, खिरवड नेहेते दोधे अटवाडे, खानापूर, निरुळ, पाडले ते राज्यहद्द रस्ता प्रजिमा- 70 किमी 58/00 ह्या मोठ्या पुलाचे बांधकाम निधी उपलब्ध होण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे तसेच जनतेची होणारी हेळसांड सदरचे दळण वळनात होत असलेल्या नुकसान थांबविण्यासाठी वाहतूकीच्या दृष्टी अन्यंत महत्वाचा असून अनेक दिवसापासून मागणी करुन ही प्रलंबित आहे पुलाचे काम करण्यासाठी अंदाजे 1 कोटी 20 लक्ष इतका निधी आवश्यक असून शासनाकडून सदरच्या कामास निधी उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (११) | ४३२३ | १० | रावेर तालुका येथील धरणगांव,सोनवद, चामगांव जामोद, भोकर, रिधुरी, इदगांव धमनगांव, कानसवाडे, नवे शेळगाव, टाकरखेडा चिखली, भालोद हिंगोना न्हावी खिरोदा उटखेडा रावेर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग -58 प्रजिमा-75/400 ते 79/400 व किमी 83/500 ते 86/500 व कीमी 86/500 ते 89/500 ते व किमी 92/500 ते 95/400 सदर हा रस्ता दळण वळण हेतूने सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी अंदाजे 3 कोटी एवढा निधी आवश्यक असून शासनाकडून सदरच्या कामास निधी उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ४३२४ | १० | रावेर तालुका येथील खिरोदा फैजपूर रोझोदा चिनावल विवरा उटखेडा कुसुंबा ते प्रमुख जिल्हा मार्ग -01 प्रजिमा-72 कीमी 11/00 ते 13/00 व किमी 19/00 ते 27/00 सदर हा रस्ता दळण वळण हेतूने सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी अंदाजे 2 कोटी 20 लक्ष एवढा निधी आवश्यक असून शासनाकडून सदरच्या कामास निधी उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |
| (१३) | ४३२५ | १० | रावेर तालुकातील दुसखेडा थोरगव्हण गाते मस्कावद दसणुर निंभोरा खिर्डी ऐनपुर अजंदे पातोंडी खिरवड मोरगांव अजनाड रस्ता प्रजिमा- 14 किमी 54/00 ते 59/00 व किमी 62/00 ते 65/00 हा रस्ता जनतेच्या रहदारीचा असून सदरचे दळण वळनात होत असलेल्या हेळसांड दुरकरण्यसाठी वाहतूकीच्या दृष्टी अन्यंत महत्वाचा असून अनेक दिवसापासून प्रलंबित आहे रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी अंदाजे 2कोटी इतका निधी आवश्यक असून शासनाकडून सदरच्या कामास निधी उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत शासन करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |
| (१४) | ४३२६ | १० | तालुका रावेर येथील प्रमुख जिल्हा मार्ग 58 ते कुंभारखेडा चिनावल वाघोदा निंभोरा रस्ता प्रजिमा 73 किमी 0/00 ते 8/00 हा रस्ता अनेक दिवसापासून प्रलंबित आहे आणि दळण वळण हेतूने सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी अंदाजे 2 कोटी 50 लक्ष एवढा निधी आवश्यक असून शासनाकडून सदरच्या कामास निधी उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (१५) | ४४२५ | १० | पुणे जिल्ह्यातील पुरंदर व हवेली तालुक्यातील सदर भाग पुणे शहरालगत असल्याने नोकरी, व्यवसाय, शिक्षण व पर्यटनाकरिता दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात नागरिकांना वाढ होत आहे त्यामुळे शहराकडे जाणारे व इतर मार्गांची दर्ज्जोन्नती त्याचप्रमाणे रस्त्यांची देखभाल दुरुस्ती भूसंपादन रुंदीकरणासह इतर कामे तात्काळ करणे गरजेचे असणे याकरिता निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संग्राम थोपटे** |
| (१६) | ४३८९ | १० | पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील राज्य महामार्ग 106 ते कोदवडी आसनी दामगुडा रस्ता ग्रामीण मार्ग 7 वर कानंदी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम, मुळशी तालुक्यातील प्रजिमा 27 ते वांजळे ग्रामीण मार्ग 66 व मुठा नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम आणि प्रजिमा 26 ते वाळेण रस्ता ग्रामीण मार्ग 39 वर मोठ्या पुलाचे बांधकाम भोर तालुक्यातील ग्रामीण मार्ग 2 |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | वर शिवगंगा नदीवर साळवडे गावाजवळ मोठ्या पुलाचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असून या पुलामुळे स्थानिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने या मोठ्या पुलांच्या कामांना नाबार्ड योजनेअंतर्गत मंजुरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दौलत दरोडा** |
| (१७) | ४४३० | १० | महाराष्ट्र शासन सा बां विभाग ठाणे-2 शहापूर तालुक्यातील O P R M C प्रकल्प अंतर्गत विविध रस्ते कामे ५५ कोटी रकमेची मार्च, २०२१ अर्थसंकल्पामध्ये मंजूर असणे, या कामांचे अंदाजपत्रकासह तांत्रिक मंजुरी मिळणे, परंतु ई-निविदा काढणेसाठी सा बां विभागाकडून आता पर्यंत मंजुरी न मिळणे, परिणामी येथील रस्त्याची झालेले दुरावस्था, येथील कामे तातडीने हाती घेणेबाबत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. अशोक पवार** |
| (१८) | ४४४६ | १० | शिरुर-हवेली मतदार संघातील वढू बु तुळापूर येथे श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे भव्य स्मारक उभे करण्याकरिता वढु बु. तुळापूर विकास आराखडा मंजूर करण्यात आलेला असणे, सदर आराखडया दरम्यान ऐतिहासिक स्थळांचे दर्शन घडविणारे असा हेरिटेज वॉक तयार करण्याकरिता आपटी ते वढु बु. रस्ता 10 मीटर रुंदीने होणे गरजेचा असणे, जेणेकरुन तुळापूर आपटी या पूलावरुन शिवभक्त् भाविक पायी ये-जा करु शकतात व पर्यटनाच्या दृष्टीने सोईस्कर होणे, त्याकरिता आपटी ते वढु बु रस्ता 10 मीटर रुंदीने होणेकरिता आगामी अर्थसंकल्पामध्ये मंजूरी मिळण्याची आवश्यकता असणे, याबाबत वरील कामे प्राधान्याने मंजूर करुन येथील ग्रामस्थांची गैरसोय दुर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |
| | | | **श्री. कुणाल पाटील** |
| (१९) | ४४६० | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील लोणखेडी - नेर - महालपंढरी - नुरनगर ते चिंचवार रस्ता इजिमा - १८ वरील पांझरा नदीवर पूल कम बंधारा बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार केलेली असणे, सदर रस्त्यांवरील नदीवर पुलाचे बांधकाम झाल्यास परिसरातील शेतकरी व नागरिकांना येण्या जाण्यास सोयीचे होणार आहे. तरी सदर मागणी लक्षात घेता शासनाने या रस्त्यांवरील नदीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ४४६२ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील एन.एच. ३ ते लळिंग - जुन्नेर -मोरशेवडी - सडगाव - अजनाळे या ग्रामीण रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांना येता जातांना अतोनात त्रास सहन करावा लागत असणे, तसेच अपघाताचे प्रमाण वाढले असल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, परिणामी सदर रस्त्यांचे तातडीने दुरुस्ती, व नुतनीकरण करणेबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२१) | ४४६६ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील फागणे ते आर्णी या ग्रामीण रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांना येता जातांना अतोनात त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, परिणामी सदर रस्त्यांचे तातडीने खडीकरण व डांबरीकरण करून नुतनीकरण करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ४४६९ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील उडाणे - गोताने -चौगाव -लोहगड या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांना येता जातांना अतोनात त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, परिणामी सदर रस्त्यांचे तातडीने नुतनीकरण करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ४४७५ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील धामणगाव ते खोरदड रस्ता ग्रामा -१२८ वरील बोरी नदीवर पोचमार्गासह बांधण्याची करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार केलेली असणे, सदर रस्त्यांवरील नदीवर पुलाचे बांधकाम झाल्यास परिसरातील शेतकरी व नागरिकांना येण्या जाण्यास सोयीचे होणार आहे. तरी सदर मागणी लक्ष्यात घेता शासनाने या रस्त्यांवरील नदीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ४४८२ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील रामा- १७ ते मांडळ -होरपाडा रस्ता ग्रामा -७३ वरील बोरी नदीवर मोठ्या पुलाचे पोचमार्गासह बांधकाम करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार केलेली असणे, सदर रस्त्यांवरील नदीवर पुलाचे बांधकाम झाल्यास परिसरातील शेतकरी व नागरिकांना येण्या जाण्यास सोयीचे होणार आहे. परिणामी, सदर मागणी लक्ष्यात घेता शासनाने या रस्त्यांवरील नदीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | ४४८६ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील आर्णी -बाळापुर -फागणे -वडजाई -पिंप्री या रामा -२११ रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांना येता जातांना अतोनात त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, परिणामी सदर रस्त्यांचे तातडीने खडीकरण व डांबरीकरण करून नुतनीकरण करणेबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२६) | ४३१८ | १० | बेट सांगवी ते गंगाबोट (ता.जि.नांदेड) या रत्यावर पूल बांधणे, रस्ता काळया मातीचा असल्याने रस्त्यावर मोठे खड्डे पडले असणे, रस्त्याची व पुलाची देखभाल व दुरुस्ती करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, पूल व रस्त्या अभावी स्थानिक रहिवाशांची हालअपेष्टा होत असणे, रस्त व पूल वाहतुकीस योग्य असणे, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाप्रती निर्मण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२७) | ४३१९ | १० | राणी सावरगाव ते पालम व्हाया सिरसम (पा.) ता.पालम, जि.परभणी या मार्गावरील रस्त्यांचे व पुलाचे काम गत २ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असणे, रस्त्याचे व पुलाचे काम तातडीने करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, रस्ता वाहतुकीस अयोग्य झाला असणे, रस्त्याचे दुरुस्तीचे डांबरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (२८) | ४३२० | १० | राणी सावरगाव ते सिरसम व सिरसम ते तांदूळवाडी, ता.पालम, जि.परभणी या रस्त्यावरील पुलांचे बांधकाम बंद पडले असणे, काम अपूर्ण असणे, रस्त्याचे डांबरीकरण करणे, रस्ता वाहतुकीस अयोग्य असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणाम स्थानिक नागरीकांची निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (२९) | ४३२१ | १० | पालम ते बरबडी सांगवी (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम अपूर्ण असणे, रस्त्यावरील नवीन पुलांचे बांधकाम तातडीने सुरु करणे, रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करणे, रस्त्याचे मजबुती करणे, याकडे संबंधित धिका-यांने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (३०) | ४३४८ | १० | उमरे मेन रस्ता ते कोंड उमरे मेन रस्ता, ता.संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी या रस्त्याची दुरावस्था झाली असणे, रस्ता वाहतूकीस अयोग्य झाला असणे, वाहतूक पुर्ववत करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, रस्ता नसल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रात जाता येत नसणे, रुग्णांची गैरसोय होत असणे, आजूबाजुच्या गावातील ग्रामस्थांची गैरसोय होत असणे, याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असणे, परिणामी नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (३१) | ४३७५ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील डोर्ली डफळापुर जिरग्याळ एकुंडी वज्रवाड बसर्गी उमराणी रस्ता प्रजिमा 64 कि. मी. 19/300 येथे लहान पुलाचे बांधकाम करण्याबाबत मागणी करण्यात येऊनही त्याबाबत कोणतेही कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | ४३७६ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील राज्य मार्ग 155 (वळसंग) सोर्डी तिल्याळ रस्ता प्रतिमा 143 कि.मी.2/00 याठिकाणी लहान पुल बांधण्याची आवश्यकता असून पुलाअभावी स्थानिकांना अनेक वाहतुकीच्या समस्या सामोरे जावे लागत असल्याने याबाबत निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३३) | ४३७८ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील राज्य मार्ग 125 ते तिप्पेहळळी कोसारी गुळवंची बेवनूर जुनोनी रस्ता प्रजिमा 142 कि.मी. 8/800 मध्ये कोसारी गावाजवळ लहान पुल बांधण्याबाबत मागणी होत असतानाही याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३४) | ४३७९ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील शिंगनहळळी वाळेखिंडी नवाळवाडी बेवनुर रस्ता प्रजिमा 58 कि.मी. 14/340 मध्ये बवनूर गावाजवळ लहान पुल बांधण्याबाबत मागणी होत असतानाही याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ४३८१ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील तासगांव लांडगेवाडी जत उमदी चडचण रस्ता राज्य मार्ग 155 कि.मी. 73/00 वर (संभाजी चौकाजवळ) व 73/400 वर (दगडी पुल ) नवीन पुलांचे बांधण्याबाबत मागणी होत असतानाही याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३६) | ४३८२ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील तासगांव लांडगेवाडी जत उमदी चडचण रस्ता राज्य मार्ग 155 कि.मी. 87/100 वर कोळगिरी गावाजवळ  नवीन पुल बांधण्याबाबत मागणी होत असतानाही याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत तातडीने कार्यवाही करुन निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता व करावयाची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल** |
| | | | **बाब क्रमांक: ७३, रूपये:- १,००,००,००,०००/-** |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (३७) | ४३५२ | १० | पुणे जिल्हयातील पुरंदर व हवेली तालुक्यातील हडपसर-भेकराईनगर-दिवेघाट, सासवड-जेजूरी-निरेपर्यंतचा पालखी महामार्गावर वाहतूक, वर्दळ वाढलेली असणे, यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी या रस्त्यांची देखभाल-दुरुस्ती, भूसंपादन, रुंदीकरणासह इतर कामे तात्काळ करणे गरजेचे असणे, मात्र येथे अपूर्ण, अर्धवट अवस्थेतील रस्त्यांची (हॅम) कामे अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याने येथे दिवसेंदिवस अपघात होत असणे, सदरील तालुक्यातील भाग हा पुणे शहरालगत असल्याने नोकरी, व्यवसाय, शिक्षण व पर्यटनाकरीता दिवसेंदिवस मोठया प्रमाणावर नागरीकरणात वाढ होणे, त्यामुळे येथील शहराकडे जाणारे व इतर सर्व मार्गांची दर्जोन्नती करणे आवश्यक असतानाही याबाबत तात्काळ कार्यवाहीस होत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (३८) | ४३७० | १० | पुणे जिल्ह्याच्या हडपसर मध्ये मुंढवा-केशवनगर ते मांजरी प्रजिमा-34 या रस्त्याचे रुंदीकरण आणि दुरुस्ती तातडीने करण्याची आवश्यकता, हल्लीच्या अरुंद रस्त्यावर वाढत्या वाहतूकीचा ताण येत असल्याने वारंवार होणारी वाहतूक कोंडी, त्यामुळे नागरीकांचा होत असलेला खोळंबा, नोकरीच्या ठिकाणी जाणारे पगारदार आणि शाळा, कॉलेजला जाणारे विद्यार्थी यांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी होणारा विलंब त्यामुळे त्यांचे होणारे नुकसान, या मार्गाचे रुंदीकरणाचे काम तातडीने हाती घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३९) | ४३७१ | १० | हडपसर (पुणे) विधानसभा मतदारसंघातील मुंढवा - केशवनगर चौकात मुंढवा ते मांजरी आणि हडपसर ते खराडी या रस्त्यांच्या छेदन बिंदू चौकात वाहनांच्या प्रचंड वर्दळीमुळे वारंवार होत असलेली वाहतूककोंडी, परिणामी वाहनांच्या वाहतूकदारांचा मोठ्या प्रमाणावर होत असलेला खोळंबा, कामावर जाणारे कर्मचारी आणि शाळा कॉलेजांकडे जाणारे विद्यार्थी यांना कामावर जाण्यास होत असलेला उशीर, मांजरी आणि लगतच्या परिसरातून पुण्याकडे भाजीपाला आणि शेतमालाची वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारपेठांपर्यंत पोहचण्यासाठी होणाऱ्या उशीरामुळे त्यांच्या मालाचे होत असलेले नूकसान, या वाहतूक कोंडीवर कायमस्वरुपी उपाय म्हणून मुंढवा-केशवनगर चौकात उड्डाणपूल किंवा अंडरपास तातडीने बांधण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (४०) | ४२६९ | १० | नाशिक -निफाड -येवला प्रमुख राज्यमार्ग क्र. २ मृत्यूचा सापळा बनल्यामुळे दि. ११ ऑगस्ट, २०२२ रोजी रस्त्यावर नागरिकांनी आंदोलन केलेले असणे, आशियाई विकास बँक अर्थसहाय्य अंतर्गत नाशिक-औरंगाबाद रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता देऊन काम चालू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २३ जुलै, २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे,नाशिक-निफाड-येवला-वैजापूर-औरंगाबाद रस्ता प्र.रा.मा क्र.२ या चौपदरी रस्त्याची पिंपळस(ता.निफाड, जि.नाशिक) ते येवला या भागात कि.मी १७९/०० ते २३५/०० दरम्यान अत्यंत बिकट अवस्था झालेली असणे, आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यामधून या रस्त्याची सुधारणा करण्याचे प्रस्तावित असणे,या रस्त्याचा ADB अंतर्गत DPR-22 मध्ये समावेश झालेला असणे, या रस्त्याला आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (४१) | ४३७७ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील गिरगांव भिवर्गी संख दरीबडची दरीकोणूर मुचंडी रावळागुंडवाडी उंटवाडी बसर्गी गुगवाड ते कर्नाटक राज्यहद्द रस्ता प्रजिमा 72 कि.मी. 38/800 ते 34/200 व 63/800 ते 70/300 हा मार्ग दोन राज्यांना जोडणारा मार्ग असून या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाल्याने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती होणे गरजेचे असल्याने यासाठी शासनाने तातडीने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल** |
| | | | **बाब क्रमांक: ७४, रूपये:- १,०००/-** |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (४२) | ४४२४ | १० | पुणे येथील पुरंदर हवेली तालुक्यातील अपूर्ण अर्धवट रस्त्यांची कामे अनेक दिवसापासून प्रलंबित असल्याने दिवसेंदिवस अपघात होत असणे, त्याचप्रमाणे वाहतुकीची कोंडी होत आहे. उदाहरणार्थ १. कापूरहोळ- नारायणपूर- सासवड २. रांजणगाव -थेऊर -उरळीकांचन- |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
| --- | --- | --- | --- |
| | | | जेजुरी -मोरगाव दरम्यान चा उरळी कांचन ते साकुर्डी फाटा या रस्त्यांची कामे होणे अत्यंत गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. शेखर निकम** |
| (४३) | ४४०८ | १०० | मौजे उमरे मेन रस्ता ते कोंड उमरे (ता. संगमेश्वर, जि रत्नागिरी) या मार्गावरील 5 कि.मी अंतराच्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, त्यामुळे या भागातील सर्व नागरिकांना व रुग्णांना कोंडउमरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधोपचारासाठी जाण्यासाठी अकारण 20 कि.मी पेक्षा जास्त अंतराचा वळसा घालून जावे लागत असणे, नागरिकांनी त्याबाबत अनेकदा तक्रारी करण्यात येऊन तसेच त्यानंतर दि. 25 मार्च, 2022 रोजी वा त्यासुमारास मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत मा. ग्रामविकास मंत्र्यांना पत्र देऊन तशी मागणीदेखील करण्यात आलेली असणे, परंतु, रस्ता दुरुस्तीची कार्यवाही न होणे, यासंदर्भात दि. 18 ऑगस्ट, 2022 रोजीच्या प्रश्नोत्तर यादीतील प्रश्नक्रमांक 47154 ला शासनाने दिलेल्या उत्तरात “प्रश्नाधिन रस्ता हा योजनाबाह्य स्वरुपाचा असल्याने रस्ते व मूळ दुरुस्तीच्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन देता येत नाही” असे नमूद करण्यात येणे, तथापि माहे ऑगस्ट, 2022 च्या पावसाळी अधिवेशनात सन 2022-23 च्या आर्थिक पुरवणी मागण्यांमध्ये 3054 - मार्ग व पुल या बाबींवर रस्ता दुरुस्तीच्या कामासाठी रुपये 1 कोटी 25 लाख इतक्या रक्कमेची आर्थिक तरतूद केल्याचे निदर्शनास येणे, त्यावरुन शासनाने रस्ता दुरुस्तीवर आर्थिक तरतूद केल्याचे दिसून येणे, त्यामुळे शासनाने दिलेल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये परस्पर विसंगती आढळून येणे, तरी सदर रस्त्याच्या दुरुस्ती कामासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (४४) | ४२५१ | १० | लाखणी (जि.भंडारा ) तालुक्यातील लाखोरी खेडेपार रेंगेपार रस्ता (प्रजिमा-२४) हा रस्ता प्रजिमा - २४ हा लाखनी तालुक्यातील रामा-३६० व रामा - ३६१ ला जोडणारा अत्यंत महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट यामहिन्यात झालेल्या अतिवृष्टीमध्ये सदरहू रस्ता हा किमी ५/०० ते ६/८०० पर्यत अत्यंत खराब झालेला असुन त्यामुळे वाहनचालक तसेच नागरिकांना या रस्त्यावरुन ये-जा करणे अत्यंत धोकादायक झाले असुन काही वेळेला या खराब झालेल्या रस्त्यामुळे अपघात होत असुन जीवीतहानी होण्याची शक्यता निर्माण झाले आहे. करिता शासनाने संभाव्य धोका लक्षात घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४५) | ४२५४ | १० | लाखणी (जि.भंडारा ) तालुक्यातील पिंपळगांव आलेसूर मासलमेटा मोरगांव रस्ता (प्रजिमा-2५-) किमी ०/०० ते ९/५०० हा रस्ता प्रजिमा-२५ हा लाखनी तालुक्यातील रा.मा.६ व रा.मा.-३६० ला जोडणार अत्यंत महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा किमी ७/०० ते ९/५०० पर्यत अत्यंत खराब झाला असुन या रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ असुनही रस्त्याच्या दुरावस्थेमुळे काही वेळेला वाहतुकीस कोंडीस, अपघाताच्या घटनांना वाहनधारकांना व नागरिकांना सामोरे जावे लागते तसेच याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला रोष लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४६) | ४२५६ | १० | लाखणी (जि.भंडारा )अडयार दिघोरी रोड राज्य मार्ग ३५८ किमी. ८/५०० ते २६/६०० सदर रस्ता राज्य मार्ग असून राष्ट्रीय मार्ग ३५३ सी ला दिघोरी मध्ये जोडत असुन तसेच २७४ हा राष्ट्रीय मार्ग अड्यार मध्ये जोडतो तसेच ३६१ हा महत्वाचा राज्यमार्ग पालांदूर येथे जोडणे. सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असल्याने चुलबंद नदिच्या बॅक वॉटरमुळे सदर रस्ता किमी. १९/०० ते २०/०० मध्ये अत्यंत खराब झालेला असुन या कारणास्तव या रस्त्यांचा वापर करणा-या वाहनचालक व नागरिकांना जीव धोक्यात घालून या रस्त्यावरुन ये-जा करावी लागती तरी नागरिकांची प्रामुख्याने वाहनचालकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४७) | ४२५७ | १० | लाखणी (जि.भंडारा ) तालुक्यातील पोहरा, गडपेंढरी, धानेटेकडी,झाडकिन्ही, मिरेगांव, सानगडी रोड कि.मी. ०/०० ते १७/६५० हा रस्ता तालुका लाखणी व साकोली ला जोडणारा महत्वाचा रोड आहे. सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे किमी. ०/०० ते २/०० मध्ये अत्यंत खराब झालेला असुन यामुळे नागरिकांची अत्यंत गैरसोय होत आहे हे लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४८) | ४२५८ | १० | लाखणी (जि.भंडारा ) तालुक्यातील पेंढरी, सुरर्शीपार, पुरकाबोडी किमी. ०/०० ते ७/०० सदर रस्ता ता. लाखणी व भंडारा ला जोडणार अत्यंत महत्वाचा असून सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट, महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अत्यंत खराब झालेला असुन किमी २/९०० ते ३/१०० या मध्ये तर या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असुन यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे करिता शासनाने याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही व उपाययोजना. |
| (४९) | ४२६१ | १० | लाखांदूर मडेघाट-पुयार रस्ता (प्रजिमा-४१) कि.मी.०/०० ते ८/५००, ता.लाखांदूर, जि.भंडारा येथील प्रजिमा-४१ हा रस्ता लाखांदूर व अर्जुनी/मोर या दोन तालुक्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै ते ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असलेल्या वैनगंगा नदीच्या बॅक वाटरमुळे सदर रस्ता कि.मी.०/७०० ते ४/६०० व ७/६०० ते ८/५०० अत्यंत खराब झालेला असल्याने सदरील रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत संबंधित विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही केली नसल्यामुळे, जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, करीता सदरील रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५०) | ४२६२ | १० | शिवताळा-जुनोना-मोहरना-गवराला-चपराड-सोनी रस्ता (प्रजिमा-४०) कि.मी.१५/०० ते ३९/०० ता.लाखांदूर, जि.भंडारा येथील प्रजिमा४० हा रस्ता लाखांदूर व पवनी या दोन तालुक्याना जोडणारा महत्वाचा रस्ता असून सनन २०२२ च्या जुलै व ऑगष्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असलेल्या वैनगंगा नदीच्या बॅक वॉटरमुळे सदर रस्ता कि.मी.२३/६०० ते २५/५०० व २७/५०० ते ३९/०० अत्यंत खराब झालेला आहे, याबाबत संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने येथील जनतेत पसरलेला असंतोष, करीता सदरील रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५१) | ४२६३ | १० | ओपारा-मांढळ-दांडेगाव-दहेगाव रस्ता (प्रजिमा-४२) कि.मी.०/०० ते १४/६००, ता.लाखांदूर, जि.भंडारा येथील प्रजिमा-४२ हा रस्ता लाखांदूर तालुक्यातील महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगष्ट  महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असलेल्या चुलबंद व वैनगंगा नदीच्या बॅक वॉटरमुळे सदर रस्ता कि.मी.०/० ते ५/०० ते ६/०० ते ६/००० व ७/८०० ते ८/२०० मधील रस्ता अत्यंत खराब झालेला आहे, याबाबत संबंधितांकडे पाठपुरावा करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५२) | ४२६४ | १० | सिंदपूरी-लाखांदूर-अर्जुनी रस्ता (रा.मा.३५४) कि.मी. १४/०० ते ३९/९५० ता. लाखांदूर, जि.भंडारा येथील रा.मा.३५४ हा रस्ता भंडारा जिल्हयातील  पवनी व लाखांदूर तालुकयांना तसेच पुढे गोंदिया जिल्हयातील अर्जुनी/मोर या तालुक्यास जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या जुलै व ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व जवळच असलेल्या वैनगंगा नदीच्या बॅक वॉटरमुळे सदर रस्ता कि.१५/८०० ते १६/००, २९/६०० ते ३०/०० ते २९/६०० ते ३०/०० व २९/६०० ते ३९/९५० मधील रस्ता अत्यंत खराब झालेला असून याबाबत संबंधिताकडे निवेदन देऊनही कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५३) | ४२६५ | १० | वडेगाव जांभळी साळुतेला रेंगेपार सातलवाडा रस्ता (प्रजिमा-२८) कि.मी.२०/२०० ते २२/२०० ता.साकोली, जि.भंडारा येथील प्रजिमा-२८ हा रस्ता भंडारा जिल्हयातील साकोली व गोंदिया जिल्हयातील सडक/अर्जुनी या दोन तालुक्यांना जोडणारा महत्त्वाच्या रस्त्यांपैकी असून सन २०२२ च्या जुलै आणि ऑगस्ट या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता कि.मी.२०/२०० ते २२/०० हा अत्यंत खराब झालेला आहे, सदरील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत संबंधितांकडे पाठपुरावा करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, यामुळे येथील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**बाब क्रमांक: ७६, रूपये:- १,०००/-**<br>**ॲड. अशोक पवार** |
| (५४) | ४४४७ | १० | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्या खालील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हवेली ही संस्था दि. 22/02/2008 रोजी चालू झाली असून सदयस्थितीत सोनाई मंगल कार्यालय, पेरणे फाटा नगर रोड, येथे भाडयाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे त्यास 2 लाख रुपये महिना भाडे असणे,  या संस्थेमध्ये सात व्यवसायांचे प्रशिक्षण चालू असून 220 प्रशिक्षणार्थी शिकत आहेत. सदर जागा प्रशिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत गैरसोईचे असून विहित मानकानुसार नसणे, सदर संस्थेसाठी वाघोली येथील जागा मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी त्यांचे कार्यालपीन आदेशान्वये गट नं. 1413, 14, 15 व 1416 मधील 3 एकर जागा या संस्थेस उपलब्ध करुन दिली असून सदर जागेचा ताबा मिळालेला असणे,  तसेच मा. कार्यकारी अभियंता सा.बां. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विभाग पुणे यांचेकडून रुपये 1278 लक्ष किमतीची तीन स्वतंत्र कामाची तीन अंदाजपत्रके तयार केली असून सदर अंदाजपत्राकास मा. संचालक व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी जिल्हा नियोजन समिती पुणे यांचेकडून निधी प्राप्त करुन घेण्याच्या अटीवर मान्यता दिलेली असणे, तरी सदर अंदाजपत्रकास मा. जिल्हाधिकारी पुणे यांची प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी आवश्यकता असणे, परंतु अद्याप कोणतीही मान्यता मिळाली नसल्याने येथील ग्रामस्थांची गैरसोय दुर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (५५) | ४२७६ | १० | येवला (जि.नाशिक) शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्याची नितांत आवश्यकता असणे, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी दि. ५ मार्च, २०२१ च्या पत्रान्वये या कामाचे रक्कम रु. ५३३ लक्षचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केलेले असणे, येवला शहर हे पैठणीचे प्रमुख केंद्र असून प्रसिद्ध पर्यटनस्थळ असणे, येथील अस्तित्वातील विश्रामगृह वापरण्यासाठी अनुकूल नसल्याने त्याचे विस्तारीकरण करणे आवश्यक असणे, येवला येथे शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करणे या कामाला प्रशासकीय मान्यता देणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५६) | ४३६० | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्रा अंतर्गत ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालूक्याचा समावेश असणे, या तिन्ही तालुक्यातील शासकीय इमारती व कर्मचारी निवासस्थान नादुरुस्त असल्यामूळे वापरण्यास अयोग्य असणे, या कारणास्तव सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे जानेवारी २०२१ पासून तर आतापर्यत शासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थान बांधकाम करण्यासाठी निधीसह प्रशासकीय देऊन मंजूर करणे, मंजूर असलेली ही सर्व कामे सुरु करण्याच्या अंतिम ठप्पात असतांनाच राज्य शासनाच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने दिंनाक २६ जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागाला कळविलेले असणे, त्यामूळे या तिनही तालुक्यातील बांधकामांना स्थगिती देण्यात आली असल्यामूळे कामे ठप्प झाली असल्याने नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामूळे माहे जुलै २०२२ च्या सुमारास राज्य शासनाने विकासकामासाठी दिलेली स्थगिती रदद करुन चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील माहे जानेवारी २०२१ पासून तर आतापर्यत मंजूर असलेले शासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थान हे विकासकामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुर्ववत सुरु राहण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ८९, रूपये:- २,५०,००,००,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (५७) | ४३५७ | १० | लासलगांव ( जि.नाशिक) बाह्य वळण रस्ता आणि रेल्वे क्रॉसिंग ब्रिजसाठी आवश्यक जमिनीचे थेट खरेदी करून भूसंपादन करण्याकरीता येथील शेतकऱ्यांनी आवश्यक संमतीपत्र दिलेले असणे,त्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने थेट खरेदीसाठी दर सुद्धा निश्चित करून दिलेले असणे,सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ खरेदीखते नोंदवून शेतकऱ्यांना मोबदला अदा करून लवकरात लवकर थेट खरेदीची कार्यवाही करणे अपेक्षित असणे, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने पुरवणी अर्थसंकल्पात रक्कम रु ३१.५० कोटी रुपये निधीची मागणी केलेली असणे,त्याचप्रमाणे या बाह्य वळण रस्त्याचे अपूर्ण काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, लासलगाव बाहय वळण रस्ता भूसंपादनासाठी निधीची तरतूद करण्यासाठी आणि या रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९०, रूपये:- ३,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५८) | ४३९१ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी व सिंदेवाही शहरामधून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरुन रेल्वे लाईन जाणे, हे दोन्ही मार्ग अत्यंत महत्वाचे आणि रहदारीचा असून रेल्वे फाटक वारंवार बंद राहत असल्यामुळे विद्यार्थी, नागरिक, रुग्णांसह रुग्णांचे नातेवाईक यांना मानसीक व आर्थिक त्रास सहन करावा लागणे, त्यामूळे ब्रम्हपूरी शहरातील रेल्वे क्रॉसींगवर शासनाने अर्थसंकल्पिय अधिवेशन २०२१ मध्ये ७५ कोटीचा रेल्वे उडाण पूल मंजूर करणे, या कामास तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्राप्त होणे,तसेच रेल्वे विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळालेला असून रेल्वे विभागाकडे १ कोटी रुपये जमा करण्यात येणे, तसेच सिंदेवाही शहरातील रेल्वे क्रॉसींगवर शासनाने अर्थसंकल्पिय अधिवेशन २०२२ मध्ये ९० कोटीचा रेल्वे उडाण पूल मंजूर करणे, या कामास स्टेज वन मंजूर झाले असून रेल्वे विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले असणे, नागरिंकाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असलेल्या या दोन्ही पुलाच्या कामास शासनाने माहे जुलै २०२२ च्या पत्रान्वेय स्थगिती देणे, त्यामूळे या पुलाचे काम आता होणर नाही अशी भावना नागरिकांत निर्माण झालेली असल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी या दोन्ही उडाण पुलाच्या बांधकामास शासनाने दिलेली स्थगिती उठवून या पुलाचे बांधकामास तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९१, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. हिरामण खोसकर** |
| (५९) | ४३३६ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मतदार संघातील तालुका त्र्यंबकेश्वर येथील रा.मा. २३ तेकाजोली खरोली रस्त्याचेबांधकाम करणे(ग्रा.मा. ८७) कक.मी. ०/०० ते६/०० ता.त्र्यंबकेश्वर, कज. नाशिक सदर रस्त्याचेदळणवळणाच्या हेतुने मजबुतीकरण वडांबरीकरण करण्यासाठी अंदाजे रु.२ कोटी इतका निधी आवश्यक असूनशासनाकडून सदरच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्यात यावा याबाबतशासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (६०) | ४३३७ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मतदार संघातील तालुका त्र्यंबकेश्वर येथील रा.मा. ३४ तेटाकेदेवागांव -सरळवाडी-येल्याची मेट तेवाकपाडा कजल्हा हद्द रस्त्याचेबांधकाम करणे, ता.त्र्यंबकेश्वर, कज. नाशिक सदर रस्त्याचे दळणवळणाच्या हेतुने मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी अंदाजे रु.१.५० कोटी इतका निधी आवश्यक असूनशासनाकडून सदरच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्यात यावा याबाबतशासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६१) | ४३४१ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मतदार संघातील तालुका त्र्यंबकेश्वर येथील त्र्यंबकेश्वर पकहनेदेवगांव घोटी रस्ता रा.मा. २३ कि.मी. १६४/०० ते१७०/०० , ता. त्र्यंबकेश्वर, कज. नाशिक सदर रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत महत्वाचा असनु सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी अंदाजे रु.३ कोटी इतका निधी आवश्यक असून शासनाकडून सदरच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्यात यावा याबाबत शासनाकडून करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९४, रूपये:- ३,६०,००,००,०००/-**<br>**श्री. दिलीपराव बनकर** |
| (६२) | ४२९३ | १०० | निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील खालील तीनही रस्ते वाहतुकीच्या दृष्टीकोनातून महत्वाची असून मुख्य रस्त्यांना जोडणारे रस्ते असल्याने या रस्त्यावरील नदी व मोठ्या नाल्यावर पुलाचे बांधकामे करणे अतिशय गरजेचे आहे. नाबार्ड आयआरडीएफ २८ या योजने अंतर्गत सदरची कामे प्रस्तावित केलेली असून शासनास मंजुरी कामी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. परंतु सदरच्या कामाला अद्यापपही मंजुरी न मिळणे शासनाकडे सातत्याने याकामी पाठपुरावा करून देखील शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. १) साकोरे ते उंबरखेड रस्ता ग्रामा-१०० वर सा.क्र.०/५०० मध्ये कादवा नदीवर मोठया पुलाचे बांधकाम करणे. २) पिंपळगाव ते आहेरगाव रस्ता ग्रामा -३८ वर सा.क्र.२/२०० मध्ये नेत्रावती नदिवर आहेरगाव गावाजवळ लहान पुलाचे बांधकाम करणे. ३) उगाव आहेर वस्ती, ब्राम्हणगाव रस्ता ग्रामा - ३२४ सा.क्र.१/२०० मध्ये मोठ्या पुलाचे बांधकाम करणेबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६३) | ४२९४ | १०० | निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील १) प्रमुख राज्यमार्ग - २ नैताळे ते (राज्यमार्ग-२७) दिंडोरी खानगाव थडी तारुखेडले तामसवाडी झुंगे खेडलेझुंगे कोळगाव रुई धानोरे डोंगरगाव विंचूर विठ्ठलवाडी कोटमगाव राज्यमार्ग - २७ ला मिळणारा रस्ता प्रजिमा -१२५ सा.क्र.१२/४०० , १३/१००, १४/४००, १८/६०० व १८/८०० मध्ये स्लॅबड्रेनचे बांधकाम करणे. २) ब्राम्हणवाडे नायगाव चाटोरी सायखेडा भुसे मांजरगाव रामा क्र.२७ ला मिळणारा रस्ता प्रजिमा - २७ सा.क्र.१४/०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे. हे रस्ते वाहतुकीच्या दृष्टीकोनातून महत्वाची असून मुख्य रस्त्यांना जोडणारे रस्ते असल्याने या रस्त्यावरील नदी व मोठ्या नाल्यावर पुलाचे बांधकामे करणे अतिशय गरजेचे आहे. नाबार्ड आयआरडीएफ २८ या योजने अंतर्गत सदरची कामे प्रस्तावित केलेली असून शासनास मंजुरी कामी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. परंतु सदरच्या कामाला अद्यापपही मंजुरी न मिळणे शासनाकडे सातत्याने याकामी पाठपुरावा करून देखील शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (६४) | ४४४२ | १० | पालघर जिल्हयातील आकेगव्हाण चिंचपाडा रस्ता रुंदीकरण आणि नानिवली नाका येथील नदीवर पुलांची बांधकाम शासकीय नाबार्ड योजनेंतर्गत पावसाच्या पूर्वी सुमारे रुपये १ कोटी ८१ लाख रुपये खर्च करुन दोन्ही पुलांची बांधकामे माहे जुन, २०२२ मध्ये पुर्ण झाल्यानंतर हा रस्ता वाहतुकीसाठी सुरु करण्यात येणे, दोन्ही पुलांची व रस्त्यांची पहिल्याच पावसाने दुरावस्था होऊन डांबरीकरण वाहून या रस्त्याला तडा गेल्याची घडलेली घटना, सदर ठेकेदाराने केलेल्या कामात कुठल्याही प्रकारची साईड पट्टी न वापरता निकृष्ट दर्जाचे व पुलाची केलेली कामे, त्यामुळे शाखा अभियंता यांच्याकडे तक्रारी दाखल करुनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने ग्रामीण भागातील कोटयावधी रुपयांच्या शासनाच्या निधीचा झालेला अपव्यय, याबाबत सखोल चौकशी करुन संबंधितांवर कठोर कारवाई करुन नव्याने रस्त्याची दर्जेदार कामे करण्याबाबत नागरिकांची होत असलेली मागणी , याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९६, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (६५) | ४२८४ | १० | राष्ट्रीय महामार्ग क्र.३ नाशिक ते ठाणे मधील नाशिक-गोंदे-वडपे या रस्त्याचा भाग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीखाली तर वडपे-ठाणे या रस्त्याचा भाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि यातील साकेत ब्रीज सह काही भाग राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिपत्याखाली असणे, साकेत ब्रीजवर आणि राजणोली व माणकोली उड्डाणपुलांच्या सुरवातीला आणि शेवटी मोठ-मोठे खड्डे पडल्यामुळे वाहतुक अतिशय संथ होवून प्रचंड वाहतूक कोंडी तयार होत असणे,तात्पुरती उपाययोजना करण्यासाठी कोल्ड मिक्स अथवा तत्सम पद्धतीने या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती केली असणे, दरवर्षी पावसाळ्यामध्ये या रस्त्यावरील ठराविक काही भागात खड्यांचे साम्राज्य तयार होते असा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भाग आयडेन्टीफाय करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत एन.एच.ए.आय.,टोल कंपनी किंवा राज्य शासनाचे संबंधित प्राधिकरणाकडून कार्यवाही केली जात नाही परिणामी दर पावसाळ्यामध्ये खड्यांचा त्रास होत असणे,ठाणे ते वडपे दरम्यान खड्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवाशांमध्ये प्रचंड असंतोष असणे,राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील नाशिक ते ठाणे या रस्त्याच्या दुरावस्थेवर उपाययोजना करणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९७, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (६६) | ४४१७ | १०<br>० | पावसाळी अधिवेशन सन-2022 मध्ये नागपूर-मुंबई शिघ्र संचार द्रुतगती मार्ग प्रकल्पाकरिता रु.1000 कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास अंशदान म्हणून उपलब्ध करण्यात आले आहे. मराठवाडा, सोलापूर, नाशिक या भागातून पश्चिम महाराष्ट्र व मुंबईकडे जाणारी व येणारी वाहतून पुणे व पिंपरी चिंचवड शहरातून जात असल्याने वाहतूक कोंडीवर पर्याय म्हणून पुणे रिंगरोड प्रकल्प राबविण्यात येत आहे. या रिंगरोड करिता निधीची आवश्यकता असल्याने वरील प्रकल्पाकरिता उपलब्ध असलेल्या रक्कमेमध्ये कपात करुन ही रक्कम पुणे रिंगरोड करिता उपलब्ध करुन देणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९८, रूपये:- १,५०,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (६७) | ४४३५ | १० | रत्नागिरी शहरातील रस्त्यावरील खड्डयांचे गांभीर्य लक्षात घेऊन “ काँग्रेस भवन ते मांडवी-बंदर रोड पर्यत “ सिमेंट काँक्रिटीकरण रस्ता तयार करणेबाबत तेथील स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांकडून मोठया प्रमाणात मागणी केली जात असणे, सदरचा रस्ता हा मांडवी बंदररोड जोडणारा असल्यामुळे गणपती विर्सजनासासठी लोकांच्या दृष्टीने महत्वाचा रस्ता असल्याने हा रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण होण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १०१, रूपये:- १९,३५,४५,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (६८) | ४२७० | १० | निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये व ४६ गावांमध्ये तलाठी कार्यालये-निवासस्थाने इमारत बांधकाम अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी जिल्हाधिकारी,नाशिक यांनी दिनांक ९.१२.२०२१ अन्वये शासनास प्रस्ताव पाठविलेला असणे, सदर प्रस्तावातील निफाड तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये -निवासस्थान |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | (रक्कम रु. ११० लक्ष) इमारत बांधकामांना अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नसणे, दि.९.१२.२०२२ च्या प्रस्तावातील उर्वरित निफाड तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये निवासस्थाने इमारत बांधकाम अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च** |
| | | | **बाब क्रमांक: १०७, रूपये:- २,०००/-** |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (६९) | ४३४३ | १० | शासनाचे सामान्य रुग्णालय, मालकी, भूमी पार्क मालाड (प.) मुंबई येथे असून या ठिकाणी ३०० खाटांची इमारत बांधण्याचे प्रस्तावित केले असणे,सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारत बांधण्याचे प्रस्तावित केले असणे, तथापि, शासनाने इमारतीचे बांधकाम अद्याप हाती घेतले नसणे, परिणामी संबंधित अधिकारी यांनी त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (७०) | ४४०९ | १० | शासनाचे सामान्य रुग्णालय मालवणी, भूमी पार्क, मालाड पश्चिम, मुंबई येथे असून शासनाने याच ठिकाणी अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक त्या सेवा देता याव्यात यासाठी रुग्णालयाच्या आवारात सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत निवासस्थानाची इमारत बांधली असणे, सदरच्या इमारतीचे भोगवाटा प्रामण पत्र मिळाले नसणे, त्यामुळे इमारत हस्तांतरीत झाली नसणे, सदरची इमारत अधिकारी व कर्मचारी यांना वापरता येत नसणे, अधिकारी व कर्मचाऱ्यांची गैरससोय होत असणे, अधिकारी व कर्मचारी यांना लांबून यावे लागत असणे, इमारतीअभावी कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असणे, याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी अक्षम्य दुर्लक्ष करीत असणे, परिणामी कर्मचाऱ्यांमध्ये व जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असणे, त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, सदरची इमारत तातडीने हस्तांतरीत करुन अधिकारी व कर्मचारी यांना निवासस्थान उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च** |
| | | | **बाब क्रमांक: १०८, रूपये:- ४,६२,४९,१६,०००/-** |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (७१) | ४२७१ | १० | ग्रामिण रुग्णालय नगरसुल ता.येवला, जि.नाशिक येथील इमारत दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे तसेच कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे या रक्कम रु. ४९९.९४ लक्षच्या पाच कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी दि.२० मे, २०२२ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला असणे, सदर इमारत दुरुस्ती व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | संरक्षण भिंत बांधणे तसेच कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७२) | ४२७२ | १० | ३० खाटांच्या येवला (जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झाले असून सदर उपजिल्हा रुग्णालय कार्यरत झालेले असणे, या रुग्णालयातील कर्मचारी निवासस्थानाचे रक्कम रु. १४९८.७४ लक्ष रकमेचे अंदाजपत्रक आराखडयासह प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव सादर केलेला असणे, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी दि. १७ मे, २०२२ च्या पत्रान्वये हा प्रस्ताव शासनास सादर केलेला असणे, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय येवला जि.नाशिक येथील कर्मचारी निवासस्थाने बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७३) | ४२७३ | १० | लासलगाव ता.निफाड जि.नाशिक येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयामध्ये शासन निर्णय क्रमांक -स्थापना २०२१/प्र.क्र. ३०२, आरोग्य ३ मुंबई दि. ६ एप्रिल २०२२ अन्वये श्रेणीवर्धन करण्यात आले असणे, सदर ३० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी अतिरिक्त २० खाटांच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रके व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी जिल्हा शल्यचिकित्सक नाशिक यांनी दि. ४ जुलै २०२२ च्या पत्रान्वये उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक या कार्यालयाला प्रस्ताव पाठविलेला असणे, लासलगाव ता.निफाड जि.नाशिक येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झाल्यामुळे अतिरिक्त २० खाटांच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रके व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २२ ऑगस्ट, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई